७ दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा सांगली
रविवार, दि. १ सप्टेंबर २०१९
Website : janpravas.in

# महाडिक अभियांत्रिकीत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा




महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये डॉ.दीपक पाटील-डांगे यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ.व्ही.ए.कुलकर्णी...

**इस्लामपूर ● प्रतिनिधी**

पेठ ता.वाळवा येथील नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रा.डॉ.दीपक पाटील-डांगे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.ए.कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमापुजन व दिपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रा.डॉ.दीपक पाटील यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जुन्या आठवणी मुलांसमोर मांडल्या. आजचा विद्यार्थी मोबाईल व आधुनिक तंत्रज्ञानाच्या आहारी जाउन मैदानी व विविध खेळांपासून दूर जात आहे. व्यक्तिमत्वाचे विविध प्रकार व एक सर्वगुण संपन्न व्यक्तिमत्व कसे असावे हे त्यांनी अभिनयासहित सांगितले. प्राचार्य डॉ.व्ही.ए.कुलकर्णी यांनी विद्यार्थी दशेतील विविध स्तरावरील खेळातील संधी, महाविद्यालय व विद्यापीठातून खेळाडूंसाठी असणाऱ्या विविध स्पर्धा याविषयी मार्गदर्शन केले. व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक व कार्यकारी संचालक प्रा.महेश जोशी यांचे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी नेहमीच प्रयत्न असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी महाविद्यालयाची विद्यार्थीनी मृणाल कुंभार हिने मनोगत व्यक्त केले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा.संदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. शिवानी मस्के हिने सुत्रसंचालन केले. अमित माने याने आभार मानले.